# ।। निरगुण बोध ग्रंथ ।।
## मारवाडी + मराठी
## सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

* वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

।। अथ निरगुण बोध ग्रंथ लिखंते ।।

साखी ।।

सुरगण निरगुण बीच मे ।। अे अरथाँ मध थाय ।।
सुरगण सुख सुखरामजी ।। निरगुण जलम मिटाय ।।१।।

सगुण व निर्गुणाच्या पराक्रमाचा हा फरक आहे की सगुण याच्याने मायेचे सुख मिळतील परंतु जन्म घेणे,मरणे सुटत नाही व निर्गुणाच्या भक्तीने अमर सुख मिळते व सोबत जन्म घेणे व मरणे हे सदाकरीता सुटते. ।।१।।

पिंडत घर जळ कुंभ मे ।। सेजे संत निवाण ।।
जन सुखिया को जीतसी ।। पिंडत साध सूं आण ।।२।।

पंड्तिाचे ज्ञान घराच्या मटक्यात भरलेल्या पाण्यासारखे मटक्या इतके आहे व संताचे ज्ञानी मोठी नदीच्या पाण्याच्या प्रवाहा सारखे आहे.अशा अपूर्ण ज्ञानाने हे पंड्तिं संताशी कसे जिंकतील?।।२।।

पिण्डत धन घर स्हा को ।। साध द्रब की खाण ।।
जन सुखिया किम जीतसी ।। पिण्डत साध सूं आण ।।३।।

पंड्तिाचे ज्ञान सावकाराच्या घरातील धना सारखे आहे(सावकाराच्या घरी किती ही धन असले,तरी ते मोजकेच असते)आणि साधूचे ज्ञान द्रव्याच्या खाणीसारखे आहे.त्या खाणीतून किती ही रत्न काढले,तरी ही त्या खाणीतून रत्न संपत नाही.तसेच हे साधूचे ज्ञान तर रत्नांच्या सारखी खाण आहे,त्याला पंड्तिं कसे जिंकतील? ।।३।।

हर गुरू साधु अेक हे ।। सब मील ज्ञान सराय ।।
सुखिया सुक्रत प्रगटे ।। तब दरसे उर मांय ।।४।।

हर,गुरु आणि साधू एकच आहे.असे सर्व ज्ञानी आपल्या आपल्या ज्ञानात महिमा करतात.परंतु आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,आधीचे काही सुकृत प्रगट असेल तेंव्हा हृदयात गुरु,साधू व हर एक आहे असे दिसेल. ।।४।।

करम ब्होत करणी घणी ।। रोग रहयो घट छाय ।।
यूं सुखिया नही ऊपजे ।। राम रटण नर चाय ।।५।।

(जीवाच्या मागे)आधीचे खुपच कर्म लागलेले आहे आणि आता ही नवीन नवीन करण्या करीत आहे याकारणाने,रामजी मिळत नाही आहे.जीवांच्या घटात हा करण्यांचा रोग पसरला आहे.याकारणाने रामनाम रटण करण्याची मनुष्यामध्ये चाहणा निर्माण होत नाही. ।।५।।

जुर जेम ताप पीड़ तेजरी ।। भोजन बास न स्वाय ।।
यूं क्रमा बस सुखरामजी ।। राम न आवे दाय ।।६।।

जसे कोणाच्या शरीरात ज्वर असला,ताप असला,कोणती पिडा असली आणि तिजारा ताप असला तर त्या मनुष्याला भोजन चांगले वाटत नाही.भोजन तर काय,भोजनाची वास(गंध)ही चांगला वाटत नाही.तर असे जीव आधीच्या कर्मांच्या वश होऊन गेले. त्यांना रामनाम चांगले वाटत नाही. ।।६।।

**धन धीणो हासल नही ।। करे मजूरी जाय ।।**
**सुध बुध बिन सुखरामजी ।। राम न आवे दाय ।।७।।**

जसे कोणाच्या घरी धन नाही,दुभते नाही आणि दुसरे कोणतेही उत्पन्न नाही,तर तो कोठे ही जाऊन मजदुरीच करेल.तर असेच आधीचे चांगले कर्म नाही राहिल्याने, म्हणजे आधीचे दुष्कर्मांनी समज आणि चांगली बुध्दी नसल्या कारणाने,त्याच्या मनाला रामनाम घेणे चांगले वाटत नाही. ।।७।।

**पीनस तन रोग हे ।। बास न आवे ताय ।।**
**जन सुखिया कर कपूर ले ।। दुरी देत बगाय ।।८।।**

जसे मनुष्याला पिन्नसचा रोग झाला,त्याला सुंगधी वस्तु आणि तरी ही,त्याला सुगंध येत नाही.तो मनुष्य सुगंधीत पदार्थाला दूर फेकून देतो.असेच ज्या मनुष्याचे आधीचे सतस्वरुप ब्रम्हचे चांगले कर्म नाही राहीले तर पिन्नसचा रोगवाला जसे सुगंधीत वस्तु फेकून देतो तसेच हा ही रामनामाला दूर करुन देतो. ।।८।।

चोपाई ।।

**प्रथम हम सत संगत कीनी ।। सुध बुध ग्यान अकल सब लीनी ।।**
**तब हिरदे एसी दरसावे ।। कहाँ सो जाय कहाँ सूं आवे ।।९।।**

सर्व प्रथम आम्ही सत संगत केली.त्या सत्संगाने आम्हाला शुध्दि(समज)आली आणि शुध्द(समज)असल्याने बुध्दी आली आणि बुध्दी आल्याने ज्ञान आणि सर्व तऱ्हेची अक्कल आली.तेंव्हा हृदयात असे दिसू लागले की मी कोठून आलो आणि कोठे जात आहे.?।।९।।

**कुण सो मरे जनम कुण जाया ।। ए मन मँझ अंदेस उपाया ।।**
**एसा भेव भिन्न कर भाखे ।। से समरथ मुझ सरणे राखे ।।१०।।**

आणि या शरीरात मरत कोण आहे?आणि जन्म घेऊन कोण आला तसेच कोणी जन्म दिला?हे माझ्या मनात प्रश्न उत्पन्न झाले.या प्रश्नांचा भेद जो वेगवेगळा करुन सांगेल तोच समर्थ आहे.त्या समर्थाच्या शरणात मी राहील. ।।१०।।

**जुग मे ग्यान सकळ मुझ सूज्या ।। षट दर्शण सब ही ले बूज्या ।।**
**अष्टंग जोग कोई सांख बतावे ।। हद कूं छाड परे नही जावे ।।११।।**

संसारातील सर्व ज्ञान तसेच(योगी,जंगम,सेवडा,संन्यासी,फकीर आणि ब्राम्हण)या सहा

दर्शनांना मी विचारले,तर कोणी अष्टांगयोग सांगतो,तर कोणी सांख्ययोग दाखवतो ज्यालाही विचारले तो हद्दीला सोडून,दुसरी हद्दीच्या पलिकडील गोष्ट सांगत नाही.।।११।।

**ऋषी मुनि पण्डत जुग सारा ।। हद ही हद मे करे बिचारा ।।**
**हद मे काळ निरंतर लूटे ।। जम दावा सूं प्रथन छूटे ।।१२।।**

हे ऋषी,मुनी आणि संसारातील सर्व पंडित आणि हा सर्व संसार,हद्दीच्या हद्दीतच विचार करतात व हद्दीत तर काळ निरंतर लुटत असतो आणि हद्दीचे देव आणि त्यांचे भक्त,यमाच्या दाव्यापासून कधी ही सुटत नाही.।।१२।।

**सबही अरथ बूज हम लीया ।। ईण ते काळ जम नही बीया ।।**
**धरणी ध्यान धरम लग लूटे ।। सुरगुण सरण हंस नही छूटे ।।१३।।**

हे सर्व ज्ञानी मी विचारुन घेतले सांख्ययोग,अष्टांग योग आणि ऋषी मुनींच्या ज्ञानाने काळ म्हणजे यम जराही घाबरत नाही.हा यम काळ ध्यान करणारे,धर्म करणारे आणि धर्माचे पालन करणारे यांना तर यम काळ लुटतो.आणि सगुण देवतांची तसेच अवतारांची शरण घेतल्याने हंस(जीव)काळ,यमापासून सुटत नाही. ।।१३।।

**में बूजत हूँ अेहे बिचारा ।। किस बिध हंस जम व्हे न्यारा ।।**
**आवागवण ब्होर नही आवे ।। से मुझ कूं कोई ज्ञान बतावे ।।१४।।**

तर मी तुम्हाला हंस कोणत्या प्रकारे यमापासून दूर होईल?व पुनः आवागमनात (जन्म–मरणात)हा येणार नाही.असे ज्ञान विचारतो.ते मला कोणी सांगा. ।।१४।।

**सुरगुण भक्त बिष्ण की साझे ।। तब लग काळ शीस पर गाजे ।।**
**सांख मत कोई रहे समाई ।। नेः चे काळ न माने काई ।।१५।।**

जो कोणी विष्णूची सगुण भक्ती साधेल,तोपर्यंत तर काळ त्याच्या शिरावर गरजेल. काळ हा स्वतः विष्णूला ही सोडत नाही.मग विष्णूच्या भक्ताला कसे सोडेल?तो सांख्ययोगाचे मत धारण करुन बसेल,तर सांख्ययोगाचे मत धारण करणाऱ्याचे काळ काही नाही ऐकणार ,निश्चितच त्याला मारेल. ।।१५।।

**जोग साझ जम कोई जीते ।। नेः चे काळ करम नही बीते ।।**
**चंद सूर पवन अर पाणी ।। धर ब्रम्हंड आकास बखाणी ।।१६।।**

कोणी योगाची साधना करुन यमाला जिंकून घेईल,परंतु निश्चितच त्याला काळ सोडणार नाही.हे योगी तर काय?चंद्र,सूर्य,वायु,पाणी,पृथ्वी आणि आकाश सर्व ब्रम्हांडाला काळ सोडत नाही. ।।१६।।

**तीनू देव सक्त न खावे ।। जम जोगी के पास न आवे ।।**
**के सुखराम सुणो संत सारा ।। ब्रम्ह जोग का भेव नियारा ।।१७।।**

तिन्ही देव(ब्रम्हा,विष्णू,महेश)आणि शक्तीला ही काळ खाऊन जातो परंतु हा यम

सतस्वरुप ब्रम्हयोग साधणाऱ्या योगीजवळ येत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,सर्व संतानो ऐका,हा सतस्वरुप ब्रम्हयोग साधण्याचा भेद,हा दुसऱ्या सर्व योगांपेक्षा वेगळा आहे. ।।१७।।

**ब्रम्ह जोग साजो तम भाई ।। आवागवण मिटे दु:ख दाई ।।**
**ऊद बुद रीत ब्रम्ह की होई ।। बिरळा संत लखे जन कोई ।।१८।।**

तुम्ही ही या सतस्वरुप ब्रम्हयोगाची साधना करा.हा ब्रम्हयोग साधल्याने आवागमन म्हणजे जन्मणे–मरणे जे खुप दु:खदायी आहे,ते मिटून जाईल,ही सतस्वरुप ब्रम्हची अद्भुत रीत आहे.या सतस्वरुप ब्रम्हच्या रीतीला कोणी विरळाच संत समजतात.।।१८।।

**सांख जोग नवद्या सूं न्यारा ।। मन पवना सूं परे बिचारा ।।**
**ब्रम्ह जोग सोही जन साझे ।। उभे अंक रसणा ले गाजे ।।१९।।**

हा सतस्वरुप ब्रम्हयोग सांख्ययोग नवविद्या भक्तीपेक्षा ही वेगळा आहे.मन व श्वासाच्या ही पलिकडे आहे.हा सतस्वरुप ब्रम्हयोग त्याच संताकडून साधला जाईल जे हे दोन रा आणि म अक्षर जीभेने रटतील. ।।१९।।

**सेजां सजे ध्यान धुन सारा ।। रटणा नांव जिभ्या बिस्तारा ।।**
**साझन सोच अेक नही राखे ।। निस दिन नांव न केवळ भाखे ।।२०।।**

असे रामनाम घेणाऱ्याचे ध्यान व ध्वनि,हे सहजच साधले जाईल.या नामाचे जिभेने रटण केल्याने हा सर्व विस्तार,सहजच होऊन जातो.साधना होण्याकरीता एक ही फिकीर ठेवत नाही.फक्त रात्रं–दिवस या न केवल नामाचे उच्चारण करेल. ।।२०।।

**रटत रटत रसणा लिव लागे ।। मन सो पवन सुरत ले जागे ।।**
**जागे सुरत सकळ चेतावे ।। सावधान सब ही होय आवे ।।२१।।**

या तऱ्हेने नामाचे रटण करता करता,रसनेने लिव लागून जाईल.मग हेच नाम मन, श्वास आणि सुरत याला घेऊन,जागृत होऊन जाईल आणि सुरत जागृत होऊन गेल्यावर ही सुरत सर्वांना चेतन करुन देईल.तेंव्हा हे सर्व मन व श्वास सावधान होऊन येतील.।।२१।।

**तीन लोक मे व्हे हेकारा ।। जब जन चल्या ब्रम्ह के द्वारा ।।**
**दाणू देव सकळ सोई धूजे ।। सनमुख आया साध कूं पूजे ।।२२।।**

मग हे जन,सतस्वरुप ब्रम्हच्या द्वारावर जाऊ लागतील.तेंव्हा तिन्ही लोकांमध्ये सर्वत्र कोलाहल होऊन लागेल.मग दानव(राक्षस)आणि सर्व देवता(तेहतीस कोटी देव)या संतांना भिऊन कापू लागतील आणि ते देव तसेच राक्षस संताच्या समोर येऊन त्या संतांची पूजा करु लागतील. ।।२२।।

**हाजर स्हेर सकळ सोई देवा ।। नवसे नार संत सुख सेवा ।।**

चोईसूं ता माँही बखाणे ।। तीनू संत सेज सुख माणे ।।२३।।

सर्व देवतांचे शहर आणि त्या देवांच्या शहरांचे देव,त्या संताच्या समोर येऊन हाजर होतील.नऊशे नारी(शरीराच्या नऊशे नाड्या)सर्व या संताची सेवा करुन,संताला सुख देणारी असेल.त्या नऊशे नाड्यांमध्ये चोवीस नाड्या मुख्य आहे आणि त्याच्यातील तीन नाडीने(इडा,पिंगळा,सुषमना)संत सहजातत सुख भोगतात. ।।२३।।

नवसे नार निनांणू बोले ।। हरषी सबही आतर खोले ।।
म्रदंग ताळ जींझ कर लेवे ।। राग छत्तीस एक सुर देवे ।।२४।।

नऊशे नाड्या बोलायला लागतील,नऊशे नव्याण्णव नाड्यांनी रामनामाची ध्वनि होऊ लागेल ह्या सर्व नाड्या हर्षायमान होऊन सर्व ही आतुर होऊन एक सारखे कोणी मृदुंग,कोणी झांझ आणि टाळ हातात घेतील.जसे छत्तीसही रागिण्या एका स्वराने गातील.।२४।

ब्रघु ढोल कोक धुन गाजे ।। भँवर गुँजार पाँख पर बाजे ।।
मुरळी बिन शंख धुन होई ।। डफ जंतर बोले मुख सोई ।।२५।।

बरघू ढोल व कोक(पितळाची पट्टीचा,हाताने वाजविण्याचा वाजा)या सर्वांची एक ध्वनि होऊन,शरीरात गरजू लागेल जसे पुष्कळसे भवरे फुलांच्या पाकळ्यांवर,ध्वनि करुन गुंजार करु लागतात.त्या सर्व भवऱ्यांची एक ध्वनि होऊन जाते.त्याच तऱ्हेने शरीराच्या सर्व नाड्यांची एक ध्वनि होऊन जाते.मुरली,विणा आणि शंख या सर्वाची मिळून एक ध्वनि होते तसेच शरीराच्या नाड्यांची एक ध्वनि होत राहते.डफ व यंत्र (लाकडाच्या दोन्ही बाजूला लौकी आणि सात-आठ तार लागलेले असतात)या सर्वांची एक ध्वनि होत राहते. ।।२५।।

प्रजा आण हाट व्हे भेळी ।। के कूटे बस्ती गळ छेळी ।।
सूवा मोर बबईया बोले ।। चेती मास कंवळ मुख खोले ।।२६।।

जशी बाजारात खुपशी प्रजा जमा होते आणि त्या सर्वांचा एकच आवाज होवून,एक सारखा ऐकू येतो.बाजारात बोलणारे लोक तर खुप असतात परंतु त्या सर्व बोलणाऱ्यांचा आवाज,एक होऊन जसा ऐकू येतो,तसे या शरीराच्या नाड्यांची वेगवेगळा आवाज एक होऊन एकच ऐकू येतो.केकूटे बस्ती गल छेली बकऱ्यांच्या झुंडीच्या गोंगाटाची एकच आवाज होत असतो आणि जंगलात पोपट,मोर आणि बबइया(एक छोटा पक्षी असतो) हे सर्व बोलतात व चैत्र मासात कोकीळा आपले तोंड उघडते,तेंव्हा या सर्वांचा एक ध्वनि होतो.।।२६।।

तेरे ताळ मंजीरा बाजे ।। निस दिन शीस एक धुन गाजे ।।
नारी बिरत नाच रंग लावे ।। छपन राग छत्तीसूं गावे ।।२७।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

आणि तेरा तालीचे तेरा ताल एकदम वाजविल्याने त्या तेरा मंजीरांची एक ध्वनि होते. तसेच या शरीरात शिरावर एक सारखी ध्वनि गरजत असते.अशाप्रकारे शिरावर दहाव्याद्वारावर,या सर्वांची एक ध्वनि होत असते.तेंव्हा या शरीराच्या नऊशे नव्याण्णव नाड्या नाचू लागतात आणि रंग राग करुन,रागिणी गाऊ लागतात आणि ते छप्पन तऱ्हेचे रंग राग करुन,छत्तीस तऱ्हेच्या रागिणी गाऊ लागतात. ।।२७।।

**जन सुखराम जोग गत भाखूं ।। भिन भिन भेद सकळ ले दाखूं ।।**
**जब जोगी तन माँय समाया ।। तीन लोक देख मध आया ।।२८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,या योगाची गती मी सांगतो.या योगाचा सर्व भिन्न भिन्न भेद मी दाखवतो.जेंव्हा हा योगी शरीरात जाऊन सामावतो.तेंव्हा या योग साधणाऱ्याला तिन्ही लोक(स्वर्ग,मृत्यु,पाताळ)दिसू लागतात. ।।२८।।

**चाले इधक भँवरू जोगी ।। तीन लोक माया रस भोगी ।।**
**बोले बेण संग कर लीया ।। शिर पर बोझ राम गुण दिया ।।२९।।**

तो योगी जसे-जसे आणखी चालेल,तसे-तसे तो तिन्ही लोकांच्या मायेच्या सर्व रसांचे भोग भोगेल आणि तो मुखाने बोलेल,त्याला सोबत करुन घेईल.तसेच रामनामाच्या गुणांचा बोजा त्याच्या शिरावर देईल. ।।२९।।

**बेगारी कूं पकड़ मंगाया ।। नारी स्हेत हाजर ले आया ।।**
**जोगी रोस बाहोत बिध कीया ।। मन पवना आगु कर लीया ।।३०।।**

आणि बेगारीला पकडून बोलावले,तो बेगारी(शब्दयोग)आपली स्त्री(सुरत)सोबत येऊन हजर होऊन गेला योगी खूपच तऱ्हेने रोस(राग)केला आणि मन तसेच श्वास याला पुढे करुन घेतले. ।।३०।।

**तीजी सुरत सक्त संग आवे ।। बेगारी शिर हुकम चलावे ।।**
**जो कोई टळे फटण की भाखे ।। सोझ घेर मुख आगे राखे ।।३१।।**

आणि तिसरी सुरत,ही जबरदस्त सोबत आली आणि ती बेगारीच्या वर हुकूम चालवू लागली.जर कोणते मन आणि श्वास किंवा शब्द वेगळे होण्यास सांगेल किंवा वेगळे होऊन गेले.त्याला शोधून(पलटवून)आपल्या तोंडाच्या समोर ठेवेल. ।।३१।।

**निस दिन करे जाप तो भारी ।। सुंन स्हेर की गेल बिचारी ।।**
**सब सूं गुष्ट ज्ञान जो देवे ।। सब पलटाय आप संग लेवे ।।३२।।**

आणि रात्रं-दिवस खुप भारी बंदोबस्त करेल आणि शुन्न शहराच्या(ब्रम्हाण्ड)रस्त्याचा विचार करेल.ही सुरत सर्वांशी गोष्ट करुन,सर्वांना पलटवून आपल्या सोबत घेते.।।३२।।

**प्रमोदे यूँ नार बिचारी ।। धिंन तुम भाग भयो बेगारी ।।**
**मुक्त मोक्ष के पंथ सिधावे ।। प्राण पुरुष आगे ले धावे ।।३३।।**

आणि ही सुरत शब्दाच्या योगीला ज्ञान देते.धन्य तुमचे भाग्य की तुम्ही बेगारी झाले.ही सर्वांना घेऊन मुक्तीकडे मोक्षाच्या रस्त्यावर जाऊ लागते.तसेच प्राण पुरुषाला आपल्या पुढे घेऊन चालु लागते.।।३३।।

**सबही पलट अेक घर आया ।। जोगी प्राण गिगन कूं धाया ।।**
**समटया सकळ द्वैत बूहारा ।। अेकण अंग संत जन सारा ।।३४।।**

हे सर्व पलटून एकाच घरात(त्रिगुटीमध्ये)आले.आणि तेथून योगीचा प्राण गगनाकडे धावला.तेथे सर्व द्वैतपनाचा व्यवहार मिटून गेला.ते सर्व संतजन एकाच स्वभावाचे आहे.(त्यांच्यात द्वैतपना काहीच राहीला नाही.) ।।३४।।

**गेली गेल निसो दिन धावे ।। उठ बेठ सूतो नही चावे ।।**
**घाटा भाँज मेर कूं मार्‍या ।। दाणूँ दुष्ट चोर संघार्‍या ।।३५।।**

गेली(योगाच्या रस्त्याने चालणारा योगी),गेल(योगाभ्यासाचा रस्ता),रात्रंदिवस चालू लागला.तो सतस्वरुप ब्रम्हयोग साधणारा,उठणे,बसणे व झोपणे ही चाहत नाही. रस्त्याचे सर्व घाट (एकवीस मणी)तोडून आणि मोर(एकवीस गाठींच्या वरची मणी) यालाही मारेल आणि रस्त्याचे दानव(अहंकार,अभिमान,लालच)दुष्ट(काम,क्रोध, लोभ, मोद,मद,मत्सर)आणि चोर (मान,बडाई,कपट आणि संशय)या सर्वांचा संहार केला. ।।३५।।

**घाट घाट बोळा जुध कीया ।। जीत्या संत पँथ सुध लीया ।।**
**आस पास गढियाँ सब ढाई ।। लड़ता तके मिल्या सब माई ।।३६।।**

आणि प्रत्येक घाटा–घाटावर खूप युध्द केले.तसेच या सर्वांना संतांनी जिंकून,शुध्द रस्ता पकडला.आजुबाजुच्या सर्व गढी किंवा (छोटे किल्ले),(भ्रम, अज्ञान, चिंता व वासना)पाडून टाकल्या.मग जे समोर भांडत होते,ते सर्व येऊन मिळून गेले. ।।३६।।

**रटण फोज आगे कर दीजे ।। पेला घाट भाँज यूं लीजे ।।**
**दूजे घाट चाल शिर आया ।। गेब फौज निसाण घुराया ।।३७।।**

ही रामनाम रटन करण्याची फौज,पुढे करुन द्या आणि पहीला घाट(कंठस्थान)या फौजेने तोडून द्या आणि दुसर्‍या घाटावर(हृदयावर)चालुन गेले.तेथे गेबावु फौजेचे निशाण गरजु लागले. ।।३७।।

**धूजे सकळ भोमिया थरके ।। व्हे हे आगा पीछा सरके ।।**
**तीजे घाट राड़ भई भारी ।। जूँझे सकळ नगर नर नारी ।।३८।।**

सर्व कापू लागले आणि भोम्या(गावातील हिस्सेदार),(मान,गर्व,गुमान,खोटे,मीपणा)धुजू लागले आणि पुढे होऊन,मागे सरकु लागले आणि तिसर्‍या घाटावर (नाभीस्थानावर) खुप मोठी लढाई झाली. त्या नगराचे सर्व स्त्री–पुरुष लढू लागले. ।।३८।।

जब सिंधु संत सूर दिराया ।। चडी चोट भेळूँ गढ काया ।।
मन चित्त पवन गेहे लीया ।। छेद पँयाळ पिछम कूं दीया ।।३९।।

जेंव्हा शुरवीर संतांनी सिंधू(वाणीचे ज्ञान)दिले,तेंव्हा सर्व चढून ज्ञानीची चोट मारुन कायेच्या(शरीराच्या)गडावर चढून गेले.मन,चित्त,श्वास आणि सुरत या चारींना भरुन एका जागी केले.हे मग खालच्या गुदाघाट वगैरे स्थानांचे छेदन करुन,पश्चिम दिशेचा (बंकनाळेचा) रस्ता घेतला. ।।३९।।

ब्रम्ह जोग क्रिया में भाखूँ ।। भक्त जोग हिरदे धर राखूं ।।
दसदा भक्त भेद यूं लीजे ।। आनदेव बदला मे दीजे ।।४०।।

मी सतस्वरुप ब्रम्हयोगीची क्रिया सांगतो आणि सतस्वरुप भक्ती योग हृदयात पकडून ठेवले आहे.दहाविद्या भक्तीचा(प्रेमभक्तीचा)भेद असा घ्या आणि अन्य देव सर्व,या दहाविद्या भक्तीच्या बदल्यात देऊन द्या(सोडून द्या)।।४०।।

भाँजी भोम पटा सब लीया ।। हरजन राज एक कूं दीया ।।
पूरब जीत पिछम कूँ आया ।। पाँचू जोध संग ले धाया ।।४१।।

भांजी भोम सर्व पृथ्वीचा भंग करुन,हा असा पट्टा घेतला आणि एका हरीजनाला (मला)राज्य दिले.पूर्व दिशा (कंठ,हृदय,नाभी,ब्रम्हस्थान,गुदाघाट स्थान)जिंकून,पश्चिम दिशेला(बंकनाळेत)आला आणि पाच योध्दे(शब्द,सुरत,मन,पवन आणि बुध्दी)सोबत घेऊन चालला. ।।४१।।

समज्या माग संत कूं दीजे ।। सन मुख राड़ आण संत लीजे ।।
पिछम देस जोरावर होई ।। कागद पतर न माने कोई ।।४२।।

जे समजलेले होते,ते संतांना रस्ता द्या,असे बोलले आणि संतांच्या सन्मुख घेऊन लढाई घ्या.हा पश्चिम देश जबरदस्त आहे.हा कागद पत्र मानत नाही.(जसे बादशाहा राजावर कागदपत्र देतो किंवा राजा कोण्या गावाच्या ठाकूरवर कागदपत्र हुकूम देतो.) त्या तऱ्हेने हुकूम पालन करतो आणि हुकुमाची अदुली करतो.याच तऱ्हेने पश्चिम दिशा जबरदस्त आहे,ही कागद पत्र मानत नाही. ।।४२।।

जब संत सूर किया दळ भेळा ।। पूरब पिछम एक घर मेळा ।।
मन की तोफ सुरत ले दागे ।। गोळा नांव गडी सो लागे ।।४३।।

तेंव्हा संतांनी दल(ज्ञान,विश्वास,शिल,संतोष,सबर,विचार,विज्ञान वैराग्य)अशी शुरवीर फौज जमा केली.तेंव्हा पूर्व आणि पश्चिमचा एकाच घरात मेळ झाला.मग मनाची तोफ सुरतने दागली.त्या फौजेतील नामाचा गोळा गढीवर लागला. ।।४३।।

पडिया ताव पिछम दळ भागा ।। हर जन जाय मेर सूं लागा ।।
ईकबिसू गढ कोट उडाया ।। तब संत शिरे त्रुगटी आया ।।४४।।

असा शब्दाचा ताव पडल्याने,पश्चिमचे सर्व दल पळून गेले.अशाप्रकारे हरीजन(मी) जाऊन मेरुमध्ये पोहचलो.मेरुदंडाचे एकवीस स्वर्ग व गड कोट(किल्ला)उड्वून पार होऊन गेलो.तेंव्हा मी शिरावर त्रिगुटीमध्ये आलो. ।।४४।।

**पुरब देस पिछम हुवा सूना ।। चवदे क्रोड़ जम मिल रूना ।।**
**ध्रमराय का देस उजाड़या ।। गढ सो कोट किल्ला सब पाड़या ।।४५।।**

अशाप्रकारे सर्व पूर्व आणि पश्चिम देश सूना(उजाड)होऊन गेले.तेंव्हा सर्व चौदा कोटी यम मिळून रडू लागले आणि धर्मरायाचा देश उजाड करुन दिला.धर्मरायाचे सर्व गड कोट(राहण्याचे घर)आणि सर्व किल्ले(रामनामाच्या गोळ्याने आणि मनाच्या तोफे ने पाडून टाकले.) ।।४५।।

**पाँच पचीस तीन नव तेरे ।। उलटा आण त्रगुटी टेरे ।।**
**जब थिर राज चले नही कोई ।। दुस्मण पलट सेण सब होई ।।४६।।**

पाच(इंद्रिये)पंचवीस(प्रकृती)आणि तीन ताप(आधी,व्याधी,उपाधी)आणि नऊ(तत्व) तेरा(त्रिगुटीच्या पुढचे तेरा लोक)हे उलटून येऊन,त्रिगुटीत पुकार करु लागले.तेंव्हा सर्व राज्य स्थिर होऊन गेले,कोणी चलायमान होत नाही.जे दुष्मन होते,ते सर्व सज्जन होऊन गेले.।।४६।।

**सिंगासण जन जाय बिराजे ।। नोपत शरू निसो दिन गाजे ।।**
**प्याला फिऱ्या अमीरस पीया ।। बेरी सेण आप दिस लीया ।।४७।।**

जेंव्हा मी सिंहासनावर(त्रिगुटीवर)जाऊन बसलो तेंव्हा नौपत वाजणे सुरु होऊन गेली. ती नौपत रात्र-दिवस गरजू लागली आणि(वैऱ्याशी मेळ होण्याच्या बदल्यात)तेथे अमृताचे प्याले पिऊ लागले,त्यातून अमृत प्राशन केले.वैरी आणि सज्जन सर्वांना मी आपल्या बाजूने घेतले. ।।४७।।

**तीनाँ के सब मांही मिलाया ।। अे सब पलट अेक मे आया ।।**
**जागी जोत भया उजियाळा ।। इण बिध साधु भया निराळा ।।४८।।**

या सर्वांना तिघांमध्ये मिळविले,ते सर्व एकात येऊन गेले.पुढे ज्योत जागृत होऊन उजेड होऊन गेला.अशातऱ्हेने मी वेगळा झालो. ।।४८।।

**आपई आप और नही कोई ।। जा संग नार रमे मिल दोई ।।**
**दोही तज अेकण मे आया ।। ज्याँ निजब्रम्ह पास नही माया ।।४९।।**

तेथे मीच होतो,माझ्या शिवाय तेथे दुसरा कोणी नव्हते.तेथे दोन स्त्रीयाँ (इडा,पिंगळा) सोबत खेळू लागल्या.दोन्ही सोडून(इडा,पिंगळा)एकत्र(सुषमनेत)आल्या.तेंव्हा निजब्रम्ह (मीच ब्रम्ह)होऊन गेलो.मग माया माझ्याजवळ राहीली नाही. ।।४९।।

**ज्यांहाँ सुखराम हुवे जन भेळा ।। माया ब्रम्ह सेज का मेळा ।।**

सुख दु:ख ब्यापे नही कोई ।। उण घर संत बिराजे सोई ।।५०।।

जेथे सर्व संत जमा होतात,तेथे माया ब्रम्हचा सहजच मेळ होतो.तेथे मायेचे सुख व काळाचे दु:ख,कोणत्याही प्रकारचे माहित होत नाही.त्या घरात जाऊन,सर्व संत विराजमान होतात. ।।५०।।

।। इति निरगुण बोध ग्रंथ संपूरण ।।